श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान संचालित,

श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे. ४१२२११.

# विद्यार्थी विकास मंडळ

**'निर्भय कन्या अभियान'**

## अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय मांडवगण फराटा ( ता. शिरूर ) विद्यार्थी विकास मंडळ, यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी 'निर्भय कन्या योजना' अंतर्गत व्याख्यान आणि स्वसंरक्षण कराटे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि. 04/03/ 2024 रोजी करण्यात आले.

उपक्रमाचे उद्घाटन सकाळी 10.15 वा. श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव मा. सौ. मृणाल राजीव फराटे पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शितोळे व उपस्थित वक्ते - डॉ. शिल्पा कट्टे (प्राध्यापक,फराटे पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज मांडवगणफराटा), ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे काटकर, (ऍडव्होकेट,सातारा ), श्री. सचिन पवार (कराटे प्रशिक्षक) यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपक्रमाचे समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.रमेश शितोळे यांनी केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रवीण कुरुमकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि मनोगत व्यक्त केले.

उद्घाटन समारंभानंतर प्रथम सत्रामध्ये डॉ. शिल्पा कट्टे यांनी 'महिलांचे आरोग्य व घ्यावयाची काळजी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानात बोलत असताना स्त्रीला निसर्गाने दिलेले वरदान म्हणजे तिचे शरीर असून त्याची योग्य काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे असे सांगितले. स्वच्छता, योग्य आहार, योगासन, व्यायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन करणे या गोष्टी तुम्हाला सदृढ बनवतील असे प्रतिपादन त्यांनी केले. आपले शरीर हे सुयोग्य आहार, व्यायाम, झोप आणि मानसिक स्वास्थ्य या चार आधार स्तंभावर अवलंबून आहे.. दैनंदिन धावपळीच्या जीवनात स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे असा सल्ला दिला.

ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे काटकर यांनी 'महिला सबलीकरण भारतीय संविधान व कायदे' या विषयावर मार्गदर्शन केले. संविधानामध्ये महिलांसाठी हक्क दिलेले अजूनही आज स्त्री ही आईच्या गर्भातही सुरक्षित नसलेली दिसून येते. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात त्यांनी भारतीय राज्यघटनेनुसार धर्म, वंश, जात, लिंग, वर्ण किंवा जन्म स्थानावरून भेदभाव करता येत नाही संविधानाने पुरुष व स्त्रीला समान हक्क व अधिकार दिलेले आहेत. कायद्या बद्दलचे अज्ञान दूर होण्याच्या दृष्टीने महिलांसाठी केलेले कायदे, तिच्या संरक्षणासाठी केलेले कायदे जाणून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. कायद्याचे ज्ञान नसल्याने अन्याय सहन केला जातो. लोक काय म्हणतील? या भीतीने विरोध केला जात नाही. विवाहपूर्व व विवाह नंतर स्त्रियांसंदर्भात असणारे कायदे, त्या कायद्यांचा वापर, फायदे-तोटे यावर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच स्त्रियांनी दिल्या गेलेल्या कायद्याचा गैरवापर करू नये असेही मत व्यक्त केले.

Student Development Officer
Shri Vasantrao Pharate-Patil College
Mandavgan Pharata, Tal. Shirur, Dist. Pune

Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College Mandavgan Pharata, Tal-Shirur, Dist-Pune-412211

PRINCIPAL
SHRI VASANTRAO PHARATE-PATIL ART'S, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDAVGAN PHARATA
TAL.SHIRUR DIST PUNE 412211

Scanned with CamScanner

दुसऱ्या सत्रामध्ये श्री सचिन पवार सर यांनी 'स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण, या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी स्वतःच्या संरक्षणासाठी तयार राहायला हवे, मनातील भीती काढून जशास तसे प्रत्युत्तर देण्यासाठी सक्षम व्हायला हवे, कोणत्याही छेडछाडीकडे डोळेझाक न करता विद्यार्थिनींनी निर्भयपणे त्याचा प्रतिकार करायला हवा असा सल्ला त्यांनी आपल्या प्रशिक्षणादरम्यान दिला. प्रशिक्षणामध्ये विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी वेगवेगळ्या कराटेच्या ट्रिक्स शिकवल्या गेल्या. स्वसंरक्षण प्रशिक्षणातूनच आपण सर्वजणी निर्भय होऊ शकाल असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील एकूण 67 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सदर अभियानास श्री वाघेश्वर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजीव फराटे पाटील, सचिव सौ मृणाल फराटे पाटील, प्राचार्य डॉ लक्ष्मण शितोळे,उपप्राचार्य प्रवीण कुरुमकर सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जयराम पवार यांनी केले तर प्रा. निलेश ढोबळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शितोळे यांचे मार्गदर्शन लाभले. ही कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली.



प्रथम सत्रामध्ये डॉ. शिल्पा कट्टे यांनी 'महिलांचे आरोग्य व घ्यावयाची काळजी' या विषयावर व्याख्यान देताना उपस्थित विद्यार्थिनी

S. Rhule
**Student Development Officer**
Shri Vasantrao Pharate-Patil College
Mandavgan Pharata, Tal. Shirur, Dist. Pune


Shri Vasantrao Pharate Patil Arts Commerce & Science College
Mandavgan Pharata, Tal Shirur, Dist Pune 412211

DCI
**PRINCIPAL**
SHRI VASANTRAO PHARATE-PATIL ART'S, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDAVGAN PHARATA
TAL SHIRUR, DIST PUNE 412211

Scanned with CamScanner



निर्भय कन्या अभियान प्रसंगी ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे काटकर यांनी 'महिला सबलीकरण भारतीय संविधान व कायदे' या विषयावर व्याख्यान देताना उपस्थित विद्यार्थिनी




निर्भय कन्या अभियान प्रसंगी श्री. सचिन पवार सर व त्यांची टीम उपस्थित विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देताना....

Student Development Officer
Shri Vasantrao Pharate-Patil College
Mandavgan Pharata, Tal. Shirur, Dist. Pune

Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College, Mandavgan Pharata, Tal-Shirur, Dist-Pune-412211

PRINCIPAL
SHRI VASANTRAO PHARATE-PATIL ART'S, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDAVGAN PHARATA
TAL.SHIRUR DIST PUNE 412211

Scanned with CamScanner






**Student Development Officer**
Shri Vasantrao Pharate-Patil College
Mandavgan Pharata, Tal. Shirur, Dist. Pune

Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College
Mandavgan Pharata, Tal-Shirur, Dist-Pune-412211

**PRINCIPAL**
SHRI VASANTRAO PHARATE-PATIL ART'S, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDAVGAN PHARATA
TAL.SHIRUR, DIST. PUNE 412211

Scanned with CamScanner